# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. ३३ // स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त // दिनांक : २२/०५/२०२०**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.**२२/०५/२०२० शुक्रवार** रोजी दुपारी १२.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती अॅड. हाडा शुचिता अतुलसिंह यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा.अॅड. हाडा शुचिता अतुलसिंह सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| बालाणी भगतराम रावलमल | देशमुख प्रतिभा गजानन |
| पोकळे दिलीप बबनराव | काळे रेश्मा कुंदन |
| खडके सुनिल वामनराव | लढढा नितीन बालमुकुंद |
| सनकत चेतन गणेश | भंगाळे विष्णु रामदास |
| सोनवणे मुकुंदा भागवत | बरडे नितीन मनोहर |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | शेख सैईदा युसुफ |
| पाटील राजेंद्र झिपरु | |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.सतिश कुलकर्णी, मा.उपायुक्त, श्री.मिनीनाथ दंडवते, श्री.कपील पवार,मुख्यलेखा अधिकारी, श्री.संतोष वाहुळे,मुख्य लेखापरिक्षक, श्री.पवन पाटील, सहा.आयुक्त, श्री.आकाश डोईफोडे, सहा.आयुक्त व श्री.सुनिल गोराणे, नगरसचिव उपस्थित होते.

**मा.सभापती :-** नगरसचिव यांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता सन्मा.सदस्य श्री.ढेकळे सदाशिव गणपत व श्री.कोल्हे प्रविण रामदास यांचा रजेचा अर्ज आलेला असुन तो सभापती महोदय यांनी मंजूर केलेला आहे .

**श्री.नितीन लढढा :-** विषय क्र.१ ते ६ मंजुर करुन घ्या.

**नगरसचिव :- विषय क्र. १:-** दि.१३/०३/२०२० रोजी संपन्न झालेल्या तहकूब स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**सौ.रेश्मा काळे :-** मान्यता देण्यात येत आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २४५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, दि.१३/०३/२०२० रोजी संपन्न झालेल्या तहकूब स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- काळे रेश्मा कुंदन**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

**नगरसचिव :- विषय क्र. २ :-** महानगरपालिका मालकीच्या विविध प्रकारच्या वाहनांकरिता सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी आय.ओ.सी.लि. पानेवाडी, मनमाड यांचेकडून २७ नग डिझेल टँकर (इंधन) x (१२००० लि.क्षमतेचे) खरेदी करणे कामी वेळोवेळी येणाऱ्या डिझेल खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.चेतन सनकत :-** सदर विषयास मान्यता देण्यात येत आहे.

**श्री.सुनिल खडके :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.चेतन सनकत :-** आपण मागच्या वेळेस २७ टँकर विकत घेतले, आता सुध्दा तेवढेच डिझेल खरेदीची रक्कम पाठवली. आपण ६ महिने आरोग्यचे टेंडर चालविलेले आहे. ११५ वाहनांमध्ये कॉन्ट्रक्टरने डिझल टाकले, तर ते डिझलची तफावत काय आहे आम्हाला समजत नाही काय आहे. किती खर्च झाला किंवा किती दिवस आपल्याला डिझल चालले ते माहिती पाहिजे.

**मा.आयुक्त :-** आम्ही याची माहिती घेऊ आणि पुढच्या सभेत माहिती देऊ.

**मा.सभापती :-** पुढील सभेत माहिती देऊ.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.२४६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिकेकडील आरोग्य, अग्निशमन, दवाखाने, पाणी पुरवठा, सार्वजनिक बांधकाम, मलेरिया, अतिक्रमण, विदयुत, प्रशासकीय विभागाकडील कार्यरत वाहनांकरिता वेळोवेळी इंधन (डिझेलची) आवश्यकता असते करिता वाहनांसाठी डिझेल खरेदी करणे आवश्यक आहे. डिझेल खरेदी करणे कामी अर्थ संकल्पीय बजेट तरतुद सन २०२०-२१ मध्ये इंधन खरेदी या शिर्षाखाली स्वतंत्र बजेट तरतुद रक्कम रु.३ कोटी मात्रची मागणी प्रस्तावित करण्यात आलेली असुन अर्थ संकल्पीय तरतुदीला स्थायी समिती व मा.महासभेची मान्यता होणे अदयाप बाकी आहे. डिझेल वाटप करणेकामी महानगरपालिका मालकीच्या डिझेल पंप आर.एल.चौफुली, एम.आय.डी.सी.फायर स्टेशन जळगांव येथे कार्यान्वित असुन त्या ठिकाणावरुन विविध विभागाकडील कार्यरत असलेल्या वाहनांवरील कार्यरत असलेले वाहन चालक व संबंधीत प्राधिकृत अधिकारी यांचे मागणी निहाय डिझेल वाटप करण्यात येते. महानगरपालिका डिझेल खरेदी ही शासकीय दरामध्ये आय.ओ.सी.लि.पानेवाडी, मनमाड येथून करणेत येते. डिझेल खरेदीची किंमतीमध्ये वेळोवेळी चढ-उतार (परिवर्तन) होत असतात.

आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये महानगरपालिकेकडील डिझेल पंपाकरिता अंदाजीत २७ नग डिझेल (इंधन) टँकरची (१२००० लि.क्षमतेचे x २७ टँकर) आवश्यकता असल्याने सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरिता एकुण अंदाजीत २७ नग डिझेल टँकर (इंधन) x (१२००० लि.क्षमतेचे) खरेदी करणे कामी वेळोवेळी येणाऱ्या डिझेल खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव**

**नगरसचिव :- विषय क्र. ३:-** अर्थ विभागातील मृत्युनिधी फंडाचे शिल्लक रक्कमे पैकी रु.३०,००,०००/- मात्र बँक ऑफ इंडीया या राष्ट्रीयकृत बँकेत गुंतवणुक करणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.सुनिल खडके:-** सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.२४७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका कर्मचारी मरणोत्तर सहाय्यक निधी सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात मृत्यु निधी अलाहाबाद बँक खात्यामध्ये आज रोजी रु.४४,०९,९४४/- मात्र इतकी शिल्लक असुन सदरचे खाते बचत खाते आहे. त्यावर मिळणारे व्याज हे कमी प्रमाणात असुन म.न.पा.चे आर्थिक हित लक्षात घेता सदर शिल्लक रक्कमे पैकी रु.३०,००,०००/- मात्र गुंतवणुक करणे आवश्यक असल्याने याकामी पाच राष्ट्रियकृत बँकांचे व्याजदर मागवीले असता सदयस्थितीत दोन वर्ष कालावधीसाठी गुंतवणुक करणे कामी बँक ऑफ इंडीयाचे व्याजदर दोन ते पाच वर्ष कालावधीसाठी ६% इतर बँकांच्या तुलनेत जास्त व्याजदर असल्याने रक्कम रु.३०,००,०००/- मात्र बँक ऑफ इंडीया मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ९ मधील कलम ९२ (२) नुसार सदरचे FDR गुंतवणुक करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- खडके सुनिल वामनराव**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्र. ४:-** अर्थ विभागातील भविष्य निर्वाह निधी फंडाचे शिल्लक रक्कमे पैकी रु.२,००,००,०००/- मात्र बँक ऑफ इंडीया या राष्ट्रीयकृत बँकेत गुंतवणुक करणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सौ.प्रतिभा देशमुख :-** सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**सौ.रेश्मा काळे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.२४८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका कार्यरत कर्मचारी भविष्य निर्वाह निधी सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात भ.नि.निधी इलाहाबाद बँक खात्यामध्ये आज रोजी रु.२,८८,७८,०४९.७८/- मात्र इतकी शिल्लक असुन सदरचे खाते बचत खाते आहे. त्यावर मिळणारे व्याज हे कमी प्रमाणात असुन म.न.पा.चे आर्थिक हित लक्षात घेता सदर शिल्लक रक्कमे पैकी रु.२,००,००,०००/- मात्र गुंतवणुक करणे आवश्यक असल्याने याकामी पाच राष्ट्रियकृत बँकांचे व्याजदर मागवीले असता सदयस्थितीत ३ YEARS TO LESS THAN ५ YEARS या कालावधीसाठी गुंतवणूक करणे कामी बँक ऑफ इंडीयाचे व्याजदर ५.९०% इतर बँकांच्या तुलनेत जास्त व्याजदर असल्याने रक्कम रु.२,००,००,०००/- मात्र बँक ऑफ इंडीया मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ९ मधील कलम ९१ ब (६) नुसार सदरचे FDR गुंतवणुक करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

यानंतर मनपा निधीची बँकेत गुंतवणूक करावयाची असल्यास ज्या राष्ट्रीयकृत बँकेचे व्याजदर जास्त असतील व ज्यामुळे महानगरपालिकेचे हीत जोपासले जात असेल अश्या करावयाच्या गुंतवणुकी बाबतच्या सर्व कायदेशिर बाबी तपासून नियमाप्रमाणे गुंतवणूक करण्याचे अधिकार याव्दारे म.आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव यांना प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- देशमुख प्रतिभा गजानन**

**अनुमोदक :- काळे रेश्मा कुंदन**

**नगरसचिव :- विषय क्र. ५:-** जळगांव शहर महानगरपालिका कार्यरत कर्मचारी यांचे अर्थ विभागातील भविष्य निर्वाह निधी फंडाची युनियन बँकेत गुंतवणूक केलेली रक्कम सदर खाते बंद करुन मिळणारे परिपक्वता रक्कम व्याजासह बँक ऑफ इंडीया या राष्ट्रीयकृत बँकेत गुंतवणुक करणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.चेतन सनकत :-** सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**सौ.प्रतिभा देशमुख :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.२४९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका कार्यरत कर्मचारी भविष्य निर्वाह निधी यापुर्वीच शिल्लक रक्कमेतुन काही रक्कमा युनियन बँकेत गुंतवणूका करण्यांत आलेली आहेत. सदर गुंतवणूकीची मुदत दि.२१/०४/२०२० रोजी संपलेली असून गुंतवणूक केलेल्या रक्कमेवर व्याजासह मिळणारी रक्कम रु.४३,९८,४२२/- मात्र इतकी प्राप्त होणार होती. सदर मुदत ठेवीच्या रक्कमा ज्या बँकेत गुंतवणूक आहेत त्याच बँकेतच मुदत संपलेल्या तारखेपासून सदरची गुंतवणूक ही व्याजासह पुर्न:गुंतवणूक म्हणुन ग्राहय होत असते.

सदरची गुंतवणूक केलेली रक्कम ही सदयस्थितीत त्याच बँकेतच असल्या कारणाने ज्या दिवशी गुंतवणूक खाते बंद केले जाईल त्या दिवसापावेतोचे प्राप्त व्याजासह मिळणारी रक्कम पुर्विचे गुंतवणूक खाते बंद केल्यावर मिळणारे परिपक्वता रक्कम व्याजासह गुंतवणूक जास्त व्याजदर असलेल्या बँकेत करणे योग्य असल्याने याकामी पाच राष्ट्रियकृत बँकांचे व्याजदर मागवीले असता सदयस्थितीत ३ YEARS TO LESS THAN ५ YEARS या कालावधीसाठी गुंतवणूक करणे कामी बँक ऑफ इंडीयाचे व्याजदर ५.९०% इतर बँकांच्या

तुलनेत जास्त व्याजदर असल्याने बँक ऑफ इंडीया मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ९ मधील कलम ९१ ब (६) नुसार सदरचे FDR गुंतवणुक करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- देशमुख प्रतिभा गजानन**

**नगरसचिव :- विषय क्र. ६:-** जळगांव शहर महानगरपालिका कार्यरत मनपा शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे अर्थ विभागातील भविष्य निर्वाह निधी फंडाची युनियन बँकेत गुंतवणूक केलेली रक्कम सदर खाते बंद करुन मिळणारे परिपक्वता रक्कम व्याजासह बँक ऑफ इंडीया या राष्ट्रीयकृत बँकेत गुंतवणुक करणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.सुनिल खडके :-** सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.२५० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका कार्यरत मनपा शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी भविष्य निर्वाह निधी खात्यातुन यापुर्वीच शिल्लक रक्कमेतुन काही रक्कमा युनियन बँकेत गुंतवणूका करण्यांत आलेली आहेत. सदर गुंतवणूकीची मुदत दि.२७/०४/२०२० रोजी संपलेली असून गुंतवणूक केलेल्या रक्कमेवर व्याजासह मिळणारी रक्कम रु.५२,५५,८७३/- मात्र इतकी प्राप्त होणार होती. सदर मुदत ठेवीच्या रक्कमा ज्या बँकेत गुंतवणूक आहेत त्याच बँकेतच मुदत संपलेल्या तारखेपासून सदरची गुंतवणूक ही व्याजासह पुर्न:गुंतवणूक म्हणुन ग्राहय होत असते.

सदरची गुंतवणूक केलेली रक्कम ही सदयस्थितीत त्याच बँकेतच असल्या कारणाने ज्या दिवशी गुंतवणूक खाते बंद केले जाईल त्या दिवसापावेतोचे प्राप्त व्याजासह मिळणारी रक्कम पुर्विचे गुंतवणूक खाते बंद केल्यावर मिळणारे परिपक्वता रक्कम व्याजासह गुंतवणूक जास्त व्याजदर असलेल्या बँकेत करणे योग्य असल्याने याकामी पाच राष्ट्रियकृत बँकांचे व्याजदर मागवीले असता सदयस्थितीत ३ YEARS TO LESS THAN ५ YEARS या कालावधीसाठी गुंतवणूक करणे कामी बँक ऑफ इंडीयाचे व्याजदर ५.९०% इतर बँकांच्या तुलनेत जास्त व्याजदर असल्याने बँक ऑफ इंडीया मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ९ मधील कलम ९१ ब (६) नुसार सदरचे FDR गुंतवणुक करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- खडके सुनिल वामनराव**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

**नगरसचिव :- विषय क्र. ७:-** उमाळा पाणी शुध्दीकरण केंद्र या ठिकाणी पाणी शुध्द व निर्जंतुकीकरण करणेसाठी लागणारे पिवळी तुरटी (अलम) पुरवठा करणे कामी पुरवठादार विक्रम केमिकल्स, नाशिक यांचे सर्वात कमीचे रक्कम रु.१२,८००/- प्रति मे.टन नुसार आलेले दर स्विकृत करणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.सुनिल खडके :-** सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**श्री.चेतन सनकत :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.नितीन लढढा :-** मा.सभापती महोदया, प्रस्ताव मान्य परंतु पाणीपुरवठा विभागाशी संबंधीत असल्याने चर्चा करणे अपेक्षित आहे. परवाच्या दिवशी सन्मा.उपमहापौर श्री.अश्विनभाऊ सोनवणे, सन्मा.विरोधी पक्ष नेता सुनिल भाऊ महाजन यांनी उमाळा जल शुध्दीकरणला भेट दिली असता, तेथील परिस्थिती अत्यंत भयानक परिस्थिती आहे. त्या संदर्भात बातमी सुध्दा लोकमत वृत्तपत्रात आली आहे. तीच हेडींगच तुम्ही बघाल की, लॉकडाऊनच्या काळात प्रशासनाचा शहर वासियांच्या जिवाशी खेळ, अशुध्द पाणीचा धोका उपमहापौरांच्या पाहणीत धक्कादायक बाब उघड झाली, कोट्यावधीची मशिनरी धुळ खात आहे. उमाळे जल शुध्दीरणावर ५८ लाख रुपये खर्च करुन तयार करण्यात आलेला रिसायकलींग टँक प्याड कधीपासुन बंद आहे. शुध्दीकरण केंद्रावर फ्लॅश मिक्सर बंद असल्याची धक्कादायक माहिती उपमहापौर श्री.अश्विनभाऊ सोनवणे यांनी दिली. अनेक ठिकाणी तेथे परिस्थिती इतकी भयानक आहे की, अक्षरशा शेवाळाचे थरचे थर साचलेले होते. म्हणजे मा.उपमहापौर आणि विरोधी पक्षनेते यांनी तेथील कथन केलेली परिस्थितीच्या अनुषंगाने मी बोलत आहे. आणि दोन्ही ही या संस्थेतले जबाबदार पदाधिकारी आहे. एक सत्ताधारी पक्षाचे उपमहापौर आहे आणि एक विरोधी पक्षाचे विरोधी पक्षनेते आहे. अश्या परिस्थिती नंतर अशी महिती भेटली की, उपमहापौरांनी तेथे भेट दिल्यानंतर स्वत:च्या घरातला महानगरपालिकेचा पाणी पुरवठा वापरणे बंद केले. ते स्वत: महानगरपालिकेच्या पाण्याला विरोध करुन बिस्लेरीच्या पाणीचा वापर करत आहे. परंतु ही परिस्थिती सर्व सामान्य लोकांना मिळविणे सारखी नाही. या संदर्भातला फेडरेशन प्लान्टची वस्तुस्थिती जाणुन घेतली की, तेथे क्लोरीन प्लान्ट आहे चार पुर्ण क्षमतेने चारही प्लान्ट चालविलेवर सुध्दा १००% पाणी निरजतुकीकरण होत नाही. कारण आता १०० ते ११० mm पाण्याची आपल्याकडुन उचल होत आहे. १०० ते ११० mm पाण्याची उचल होत असतांना चार प्लान्ट पुर्ण स्थिती मध्ये चालवुन सुध्दा ते कमी पडतात. त्याच्या पुढची स्थिती अजुन भयानक आहे की, तेथे फक्त १ फिल्टर प्लान्ट सुरु आहे. एक क्लोरीन पंप सुरु आहे आणि तो ही पुर्ण क्षमतेने नाही. म्हणजे जळगांव शहराला मिळणारा पाणी हे फक्त १० ते १५% शुध्द होत आहे. आणि ८५% पाणी जंतुरहित या शहराला पुरवठा होत आहे. हे अत्यंत गंभिर आणि नागरीकांच्या जिवाशी झालेला खेळ. तेथे क्लोरीन ऑपरेटर म्हणुन ज्याची नियुक्ती झालेली आहे. त्याचे एज्युकेशन सुध्दा क्लोरीन ऑपरेटरचा नाही. त्याचे शिक्षण आहे. मुख्य क्लोरीन ऑपरेटर म्हणुन भांडारकर काम पाहतात. आणि ते सिव्हील डिपलोमा झालेले आहेत. आणि मॅथमॅटिक्स मध्ये काही तरी केलेले आहे. त्यांच्या हाताखाली काम करणारा दुय्यम दर्ज्याचा जो क्लोरीन ऑपरेटर आहे त्याचे मात्र शिक्षण क्लोरीन ऑपरेटरच आहे. बी.एस.सी. (केमिकल) झालेले आहे. परंतु मला समजत नाही. एखाद्याकडे ज्या विषयाचा कॉलिफीकेशन आहे. त्याला त्याची जबाबदारी न देता एखादा सिव्हील डिप्लोमा झालेल्या व्यक्तीला त्याची जबाबदारी द्यायची. याला गोंधळ कारभारचा चांगला नमुना म्हटला जाईल. आणि क्लोरीनच्याबाबतीत जे क्लोरीनेशन व्हायला पाहिजे की, शहरात येता येता ०.५ % ते यायला पाहिजे. जेणे करुन ते पाणी २४ तास निर्जतुंक म्हणुन राहायला पाहिजे. परंतु जे २४ तास जळगांवच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत पोहचणारे पाणी आहे त्याची मात्रा मात्र त्याच स्थितीतील आहे. जेथे पोईंट ४ पाहिजे तेथे मात्रा ०.५ क्लोरीनची तेथे मिसळली जाते. याचा अर्थ शहराच्या शेवटच्या टप्प्या पर्यंत त्या क्लोरीनचा कुठलाही फायदा त्या पाण्यामध्ये दिसुन येत नाही. म्हणजे एकीकडे आपण कोविडची महामारीशी लढतो आहे. येणारा काळ हा पाऊसाळयात राहिल. एक महिन्यानंतर पाऊसाळा सुरु होईल. आणि अश्या परिस्थिती मध्ये अश्या पध्दतीची यंत्रणा, आणि साधारणता हे फक्त ३ प्लान्ट क्लोरीनचे तब्बल १ वर्षापासुन बंद आहे. मला हे समजत नाही की, त्या विभागाशी संबंधीत अधिकाऱ्यांना या गोष्टीच गांभिर्य कळाले नाही का ? आमच्या सारख्या नॉन टेक्नीकल माणसाला ह्या गोष्टी एका मिनिटात कळतात की, काय असायला पाहिजे आणि काय व्हायला पाहिजे. परंतु जे टेक्नीकल माणुस आहे त्यांना याचा गांभिर्य नाही का ? त्यांनी पुढे मागणी केल्यानंतर प्रशासनाने मान्य केला नाही. किंवा प्रशासनाने प्रस्ताव दिल्यानंतर स्थायी समितीने मान्य केले नाही. किंवा महासभेने मान्यता दिली नाही. म्हणून तो पुरवठा होवू शकत नसेल तर याच्या अनुषंगाने या गोष्टी आम्ही समजु शकतो. त्याला आम्हीपण तेवढेच जबाबदार आहे. परंतु जबाबदार व्यक्ती जे असे पदावर बसलेले आहे. ते काय करतात. आणि हा न उघडणारा कोड आहे साहेब. आपण स्वत: या विषयाचे गांभिर्य समजुन जे काही उपाययोजना पाऊसाळयाच्या पुर्वी करायच्या असतील ते तातडीने होणे गरजेचे आहे. अन्यथा काय होईल. एका साथीशी लढता लढता जर आपण दुसऱ्या रोगाकडे वळलो. आणि मग जी परिस्थिती डोळया समोर येईल. याच्यापेक्षा बिकट पाहायला मिळेल. तरी माझी विनंती आहे आपल्या ज्या ज्या उपाययोजना यावर करता येईल आपण करावी.

**मा.सभापती :-** या सर्व बाबींना प्रशासनाने खुप गांभिर्याने घ्यावे, तेथे सुरक्षा रक्षक असणे खुप आवश्यक आहे. तर या सर्व बाबी लक्षात घेऊन प्रशासनाने ताबडतोब कार्यवाही करावी.

**मा.आयुक्त :-** या संदर्भात जी बातमीचा उल्लेख आपण केला, ते पत्र सन्मा.उपमहापौरांनी माझ्याकडे दिले आणि ते बोलले सुध्दा. मी या गोष्टी लॉकडाऊनच्या पिरियड मध्ये वाघुर पाणी पुरवठा यंत्रणेला निर्देश दिलेले आहेत यात ज्या गोष्टी नमुद केलेल्या आहे. त्यात काही तांत्रिक बाबी आहे. किंवा दुरुस्तीला आवश्यक आहे. त्याच्या मध्ये जे घटक आहे.- राज्य शासनाच्या गाईडलाईन याच्यामध्ये जी गोष्टी नमुद केलेल्या आहे. या बाबतीत ज्या तांत्रिक बाबी आहे. ते करणे

आवश्यक आहे. त्याच्यामध्ये शासनाची १ कोटी ७२ लाखाची जी निधीचा बजेट आहे ते आपण उमाळा पाणी पुरवठा वर खर्च करणार आहोत. त्या ठिकाणी जो ब्रिज आहे. त्याचा खर्च साधारणता १७ ते १८ लाख रुपये आहे. तर हा खर्च आपण महानगरपालिकेतुन करण्या ऐवजी अमृत योजनेमधुन अॅग्रीमेंट करुन हे काम करु. क्लोरीन मशिनच्या बाबतीत आपण जे म्हणत आहात. तर ब्लीचींग पावडर आणि गॅस पंप, लिक्वीड गॅस, चालु आहे. मला मिळालेल्या माहितीनुसार क्लोरीनेशन प्रॉपर आहे. ब्लिचींगचा वॉपर प्रॉपर होत आहे. गॅस पंप ,लिक्वीड गॅस प्रॉपर आहे तरीही यात कोणी दोषी आढळल्यास त्यावर कारवाई अवश्य करु. येणाऱ्या पावसाळयात कोणाकडेही दूषित पाणी पुरवठा होणार नाही याची आपण काळजी घेऊ. पाण्यापासून आजार पसरणार नाही याची खबरदारी अवश्य घेऊआणि जे प्लॉन्ट बंद आहेत ते दुरुस्त करण्याचे पाणी पुरवठा अभियंता यांना सूचना करु.

**नगरसचिव :-** आदरणीय भाऊ, (नितीन लढढा) सदर प्रस्ताव सर्वानुमते मंजुर आहे का ?

**श्री.नितीन लढढा :-** हो,

**नगरसचिव :-** भाऊ, सदर प्रस्ताव सर्वानुमते मंजुर आहे का ?

**श्री.भगतराम बालाणी :-** एकदा त्यांनी सर्वानुमते मंजुर सांगितल्यावर पुन्हा का विचारता साहेब ?

**नगरसचिव :-** असे विचारावे लागते. माझी डयुटी आहे.

**मा.सभापती :-** भाऊंनी मास्क घातल्यामुळे समजल नाही. म्हणुन त्यांनी पुन्हा विचारले.

**श्री.नितीन लढढा :-** हो. सर्वानुमते मंजुर आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.२५१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव उमाळा पाणी शुध्दीकरण केंद्र या ठिकाणी पाणी शुध्द व निर्जतुकीकरण करणेसाठी लागणारे पिवळी तुरटी (अलम) पुरवठा करणे कामी आयुक्त यांच्या मान्यतेने ई-निविदा सुचना क्रं.१३/२०१९-२० http;//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली असुन ई-निविदा सुचना म.न.पा.पत्र क्रं.भांडार/१५४/२०१९-२० दि.०४/०३/२०२० अन्वये दै.लोकमत (राज्यस्तरीय) वर्तमान पत्रात दि.०५/०३/२०२० रोजी प्रसिध्द केल्यानुसार दिलेल्या मुदतीत ०४ ई-निविदा प्राप्त झाले. पैकी आयुक्त यांच्या दि.१७/०४/२०२० च्या मान्यतेने पात्र झालेले ०३ निविदाधारकांचे दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| निविदा धारकाचे नांव | अलमायटी केमिकल्स, नाशिक | विक्रमकेमिकल्स,नाशिक | स्वानंद ट्रेडर्स प्रा.लि. लोणी खु. अहमदनगर |
|---|---|---|---|
| निविदा रक्कम प्रति मे.टन | १३,०००/- | १२,८००/- | १२,८५०/- |

पात्र ०३ निविदाधारक पैकी पुरवठादार विक्रम केमिकल्स,नाशिक (L१) यांचे दर सर्वात कमीचे रक्कम रु.१२,८००/- प्रति मे.टन नुसार आलेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ७३(क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- खडके सुनिल वामनराव**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- विषय क्र. ८:-** जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.१३/०१/२०२० ते दि.१९/०१/२०२०, दि.२०/०१/२०२० ते दि.२६/०१/२०२०, दि.२७/०१/२०२० ते दि.०२/०२/२०२०, दि.०३/०२/२०२० ते दि.०९/०२/२०२०, दि.१०/०२/२०२० ते दि.१६/०२/२०२०, दि.१७/०२/२०२० ते दि.२३/०२/२०२०, दि.२४/०२/२०२० ते दि.०१/०३/२०२०, दि.०२/०३/२०२० ते दि.०८/०३/२०२०, दि.०९/०३/२०२० ते दि.१५/०३/२०२०, दि.१६/०३/२०२० ते दि.२२/०३/२०२० व दि.२३/०३/२०२० ते दि.२९/०३/२०२० या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेणे.

**सौ.प्रतिभा देशमुख :-** माहिती घेतली.

**सौ.काळे रेश्मा :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.२५२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.१३/०१/२०२० ते दि.१९/०१/२०२०, दि.२०/०१/२०२० ते दि.२६/०१/२०२०, दि.२७/०१/२०२० ते दि.०२/०२/२०२०, दि.०३/०२/२०२० ते दि.०९/०२/२०२०, दि.१०/०२/२०२० ते दि.१६/०२/२०२०, दि.१७/०२/२०२० ते दि.२३/०२/२०२०, दि.२४/०२/२०२० ते दि.०१/०३/२०२०, दि.०२/०३/२०२० ते दि.०८/०३/२०२०, दि.०९/०३/२०२० ते दि.१५/०३/२०२०, दि.१६/०३/२०२० ते दि.२२/०३/२०२० व दि.२३/०३/२०२० ते दि.२९/०३/२०२० या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- देशमुख प्रतिभा गजानन**

**अनुमोदक :- काळे रेश्मा कुंदन**

**नगरसचिव :- विषय क्र. ९ :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

**श्री.चेतन सनकत :- माहिती घेतली, प्रस्ताव मान्य.**

**सौ.प्रतिभा देशमुख :- माझे अनुमोदन आहे.**

**श्री.नितीन लढढा :-** संविदा क्र.१ ते ३ ची माहिती घेतली संविदा क्र.४,५,८ आणि ९ याची सविस्तर माहिती द्यावी.

**मा.सभापती :-** विषय क्र.२ बाबत मी प्रशासनाच्या लक्षात आणुन देते की, येथे आकडेमोडीची काही चुक झालेली आहे. त्याची दुरुस्ती करण्यात यावी. येथे १,२०,५५,०००/- ची आकडेमोड दिसत आहे.

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-रू १२,०५,२९५/-** लाख आहे ती.

**मा.सभापती :-** याची नोंद घ्यावी.

**श्री. दिलीप पोकळे :-** माझ्या प्रभाग क्र.१ मध्ये आपले महानगरपालिकेचे कायम ४० कामगार आहे. वेळेवर तेथे फक्त १०-१२ कमगार असतात. माझा वाढीव भाग आहे. म्हणजे मागील ३-४ वर्षांमध्ये भयंकर भाग वाढलेला आहे. मी साहेबांना ही भेटुन सांगितले, तरी मला ३० कामगार माझ्या वार्डात वाढुन देण्यात यावे.

**मा.सभापती :-** सन्मा.सदस्यांनी सांगितले प्रमाणे प्रशासन जर वाढीव कामगार देऊ शकतो तर कामगार वाढुन द्यावे.

**श्री.नितीन बरडे :-** ४ संविदा आहे कामगारांबाबत त्याची सविस्तर माहिती द्यावी.

**श्री.नितीन लढढा** :- मा.आयुक्त साहेब हा सर्व गांधळ सुरु झाला जेव्हा जळगांव शहर महानगरपालिकेने वॉटरग्रेस या कंपनीला आरोग्याचा मक्ता दिला. आरोग्याचा मक्ता देण्याच्या कार्यादेशाला सुध्दा आमचा विरोध होता. तदनंतर ही तो बहुमताने ठराव पारित करुन त्या मक्तेदाराला मक्ता दिला.

**श्री.भगतराम बालाणी :-** प्रशासनाच्या हट्टामुळे.

**श्री.नितीन लढढा :-** तर आता त्या मक्तेदाराने जळगांव शहरात आरोग्याच्या संदर्भात कामाला सुरुवात केली. त्याच म्हणणे तो त्याच्या जागी मांडतो की, महानगरपालिकेने अटीशर्ती प्रमाणे जे काही वस्तु प्रोवाईड करावयाच्या होत्या त्यांनी केलेले नाही म्हणुन मी महानगरपालिकेच काम पार पाडु शकलो नाही. हे त्याचे म्हणणे आहे. महानगरपालिकेने त्यात याची भुमिका स्पष्ट केली. परंतु ज्या दिवसापासुन तो वॉटरग्रेसचा मक्तेदार जळगांव महानगरपालिकेमध्ये कार्यरत झाला त्या दिवापासुन बंद पडे पर्यंत कायम वादातिल चित्र या शहरामध्ये होत आहे. आपल्याला त्याच्याशीही काही घेण देण नाही परंतु मक्तेदाराचे काम बंद पडल्यानंतर मक्तेदारानी पर्यायी व्यवस्था केल्यावर तातडीने नविन कामगार महानगरपालिकेच्या सेवेमध्ये पर्यायी व्यवस्था उभारणी करण्याचे अनुषंगाने अतितातडीने निविदा प्रक्रिया पार पाडली. निविदा एक वेळा आली प्रतिसाद मिळाला नाही. निविदा पुन्हा रिकॉल केली प्रतिसाद मिळाला नाही. तिसऱ्यांदा निविदेला प्रतिसाद मिळाला. थर्ड निविदेला प्रतिसाद मिळाल्यानंतर, आजपावेतो त्या निविदा उघडण्यात आलेल्या नाही. त्याच्या मागच गोडबंगाल काय हे मला माहित नाही. परंतु २०१६ ला झालेल्या ठरावाच्या च्या अनुषंगाने बांधकामासाठी मजुर लावुन घेण्याच्या संदर्भातील एका ठेकेदाराला ४००-६०० कामगारांचा मक्ता दिला होता हे कितपर्यंत योग्य आहे. दोन गोष्टी आहे. वॉटरग्रेस ने केलेल काम चुकीच असेल. तर प्रथम: त्याच मक्ता रद्द करण्याच्या संदर्भातली भुमिका प्रशासनाने तातडीने उचलली पाहिजे होती. Meanwhile ज्या तातडीने निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. सर्व पदाधिकाऱ्यांचे स्टेटमेंट होते हे की, वॉटरग्रेसच काम समाधान कारक नसल्याने त्याची निविदा प्रक्रिया ही रद्द करण्यात येणार आहे आणि रद्द करण्याच्या

अनुषंगाने पर्यायी व्यवस्था म्हणुन तातडीने निविदा प्रक्रिया राबविली जाईल. आणि त्या पध्दतीने राबविली ही गेली. परंतु त्या निविदा उघडण्याचे मागच रहस्य काय ? जनतेला ही कळल नाही या सभागृहातील सन्मा.सदस्यांना ही कळाले नाही. आणि मग कामाची गरज भागविणेच्या अनुषंगाने जुन्या एखाद्या मक्तेदाराला जिवंत करायच आणि त्याला ६००-६५० मजुरांचा ठेका द्यायचा हे कुठे नियमात धरुन आहे. हे जे काही चाललेल आहे त्यात भ्रष्ट्राचार आहे किंवा नाही हे मला माहित नाही. परंतु गंभिर अनियमित्ता आहे. म्हणजे त्याला रद्द केल जात नाही तो ही एक सस्पेंस कायम आहे. नव्या आलेल्या निविदा उघडल्या जात नाही तो ही एक सस्पेंस कायम आहे. एखाद्या जुन्या मक्तेदाराला जिवंत करुन कोट्यावधीचे काम दिल जात तो ही एक सस्पेंस कायम आहे. या सस्पेंस वरुन पडदा प्रशासनाने थोडा ओपन करावा. नेमक आम्हाला कळेल की, आमच्या या व्यवस्थेमध्ये काय चाललेल आहे आणि जे चाललेले आहे ते योग्य पध्दतीने चाललेले आहे का ? ७०० कर्मचाऱ्यांच्या संदर्भात वॉटरग्रेस ही एक न्यायाची भुमिका होती. वॉटरग्रेसला मक्तेदार जेव्हा महानगरपालिकेकडे, दंडवते साहेब येथे बसलेले आहे. ज्या वेळेला वॉटरग्रेस ने अंतिम बिलाची महानगरपालिकेकडे मागणी केली असता, त्याला त्याच्याकडे असलेले कर्मचाऱ्यांचे पी.एफ.चे अकाऊंटस, त्यांची भुमिकाची होती ती नियमानुसार होती. त्यांच्या भुमिकेवर मला काही प्रश्न चिन्ह नाही किंवा शंका नाही. पी.एफ.चे अकाऊंटस महानगरपालिकेला सादर केल्यानंतर त्याच्या बिलाची अदायगी होईल अशी भुमिका होती दंडवते साहेब, नविन निविदेच्या बाबतीत त्या भुमिकेला रिलॅक्सेशन किंवा फाटा कश्या पध्दतीने देण्यात आलेला आहे. मग एक न्याय किंवा एक कायदा आपण जेव्हा एका मक्तेदारासाठी वापरत असतो. मग दुसऱ्या मक्तेदारावर इतकी महेरबानी का ? तो इतका प्रभावशाली मक्तेदार आहे काय ? की एखाद्या प्रभावशाली व्यक्तीचा हात त्याच्या डोक्यावरती आहे ? या सर्व गोष्टी जी आहे शंकेला जन्म घालतात. या आयुषकाने आता पर्यंत मक्तेदाराने दोन तीन महिने जे काही काम केलेल असेल. त्या सर्व मजुरांचे पी.एफ.चे खाते मक्तेदाराने महानगरपालिकेला सादर केले होते का ? केलेले असल्यास पुर्वीच्या नियमाप्रमाणे मजुरांच्या अकाऊंट मध्ये पैसा जायला पाहिजे. हे सुध्दा आपल्या अटीशर्तीत आहे. त्या पध्दतीने प्रत्येक मजुराच्या खात्यात तो पैसा गेलेला आहे का ? त्याचा पी.एफ. नियमानुसार भरला गेला काय ? ई.एस.आय.चा पैसा भरला गेलेले आहे काय? समजा त्या मजुराला काही कमी जास्त झाल तर त्याच्या वैद्यकीय खर्चाची परिपुर्तता करणार कोण ? हा त्याच्या जिवन- मरण्याचा प्रश्न आहे. या सर्व गोष्टींचा तंतोतंत पालन झालेला आहे किंवा नाही. या संदर्भातील सविस्तर खुलासा सभागृहासमोर करावा ही माझी प्रशासनाला विनंती आहे.

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य विभाग :-** विषय क्र.४ च्या अनुषंगाने जे प्रश्न उपस्थित करण्यात आलेले आहे. मी माहिती देतो, वॉटरग्रेस कंपनी ने ऑगस्ट २०१९ मध्ये काम सुरु केल्यानंतर वेळोवेळी त्यांच्या कामाच्या ज्या त्रुटया होत्या. त्या अनुषंगाने आम्ही त्यांना वेळोवेळी लेखी कळविलेले होते. वार्डामध्ये त्यांची पुर्तता होत नव्हती. डिसेंबर २०१९ आणि जानेवारी २०२० पर्यंत ३ वेळा कामकाज मोठया प्रमाणावर ठप्प झालेले होते. शहरात कचऱ्याची समस्या मोठया प्रमाणात निर्माण झालेली होती. वॉटरग्रेस कंपनीच्या काही मागण्या आपल्याकडे होत्या की, रॅम्प करु न मिळाव आणि वजन काटा करुन मिळावे. आपण त्यांना खाजगी वजन काटा उपलब्ध करु न दिलेला होता आणि रॅम्पसाठी आपण त्यांना तात्पुर्त्या स्वरु पाची जागेवर टेमपररी रॅम्प टाकलेले होते. कामकाज सुरु होता परंतु डेली साफसफाईसाठी कामगार पुरविणे आणि वाहणे पुरविणे याची पुर्तता मक्तेदाराकडुन होत नसल्यामुळे मोठया प्रमाणात कचऱ्याची समस्या होत होती. जानेवारी एन्ड आणि फेब्रुवारीच्या महिन्यामध्ये ८ ते १० दिवस मोठया प्रमाणात वाहनांची संख्या आणि कामगारांची संख्या कमी झालेली होती. ४०० कामगारांची पुर्तता त्यांनी बंदच केलेली होती. आपण त्यांना वेळोवेळी संधी दिली होती की, तुम्ही ही सर्व पुर्तता करा. त्यांनी आपल्याला स्पष्ट केल की, ऐवढी यंत्रणा आमची तयार नाही. म्हणुन ३ ते४ शिफ्ट मध्ये यंत्रणा राबविणेची त्यांनी तजविज केलेली होती. आपण त्यांना असे पत्र दिले की, तुम्ही आमचे वाहने ताब्यात द्या आणि असे आपण ती वाहने ताब्यात घेतली. आणि पर्यायी तात्पुर्ती व्यवस्था म्हणुन बांधकाम विभागाकडे जे ठेकेदारांचे मजुरांचे दर मंजुर आहे असे ठेकेदाराकडुन रोजंदारीवर काम करणेसाठी आपण निर्णय घेतलेला आहे. या मध्ये आपण १४ व्या वित्त आयोग्याच्या अनुषंगाने घनकचरा व्यवस्थापनामधील जो निधी मंजुर आहे त्याबाबत सप्टेंबर २०१६ चा मा.सभागृहाचा निर्णय झालेला आहे. आणि जे दर मजुरांचे मा.स्थायी समितीने मंजुर केलेले आहे. वॉटरग्रेसचे दर रु .५४३/- प्रति मजुर आहे. बांधकमाचे दर मात्र रु .५२०/- आहे. म्हणजे वॉटरग्रेसच्या मजुरांपेक्षा ही कमी दर आहे. आणि याला प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार मा.आयुक्त साहेबांना आहे. त्याचे माणसांपेक्षा सप्टेंबर २०१६ च्या दराच्या अनुषंगाने तात्पुरत्या स्वस्मात वॉटरवर्क कर्मचारी आणि रस्ते गटार साफसफाई कर्मचारी असे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. कर्मचाऱ्यांच्या बाबत पी.एफ.आणि जी काही शासकीय परिपुर्ती आहे. बांधकाम विभागातील ज्या निविदेतील अटीशर्ती आहे. त्याची पुर्तता करणे त्या ठेकेदाराला बंधनकारक आहे. मी जे माहिती घेतली त्या प्रमाणे, ३०० लोकांची पी.एफ.ची खाते ओपन केलेली आहे. यात काहींचे पी.एफ. खाते बाकी आहे कारण काही कामगारांचे जे आवश्यक कागदपत्रे आहे पी.एफ.साठी ते उपलब्ध होत नाही.

**श्री.नितीन लढढा :-** दंडवते साहेब, किती तारखेला वाहने ताब्यात घेतली.

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य विभाग :-** ६ मार्च ला.

**श्री.नितीन लढढा :-** ६ मार्चला, म्हणजे एप्रिल, मे हे जवळपास अडीच महिन्याचा कालावधी झाला. अडीच महिन्याच्या कालावधी मध्ये वॉटरग्रेसच्या संदर्भातला निर्णय काय घेतला आणि मध्यंतरीच्या कालावधीमध्ये ज्या निविदा प्रक्रिया तातडीने राबविल्या गेल्या ते अजुन का उघडलेले नाही त्या संदर्भातील सुध्दा माहिती प्रथम: द्या. ही सगळी रामायण, याची हिस्ट्री आम्हाला माहिती आहे. ज्या महत्वाच्या गोष्टी आहे त्याच्यावर स्टेटमेंट द्या.

**श्री.दंडवते, उपायुक्त, आरोग्य विभाग :-** पुरेशे कामगार पुरत नाही म्हणुन आपण तत्कालीन आयुक्त साहेबांच्या निर्णयाप्रमाणे ३ निविदा प्रसिध्द केलेल्या होत्या. त्या निविदा ओपन केल्यानंतर, त्याला दोनदा प्रतिसाद मिळाले नाही तिसऱ्यांदा प्रतिसाद मिळालेला आहे. त्या निविदा ओपन केल्यानंतर मा.आयुक्त साहेब यांची विधी सल्लागार यांच्याशी समक्ष चर्चा ही झाली. वॉटरग्रेसचा निर्णय होऊन गेल्यावर याचा निर्णय घेऊ अशी त्यांनी सुचना दिली. त्या अनुषंगाने आम्ही अंतिम नोटीसचा जो अभिप्राय विधी सल्लागारांचा मागितला होता त्यांनी परवा तो अभिप्राय दिलेला आहे. त्यात वॉटरग्रेस कंपनी बाबत आहे की, त्यांनी आता कामाची तयारी दर्शविलेली आहे. त्यांना एकदा संधी द्यावी असा अभिप्राय त्यांनी दिलेला आहे. आणि या ३ निविदाबाबत सुध्दा त्यांनी तसाच अभिप्राय दिलेला आहे. त्या अनुषंगाने आम्ही ती फाईल आज साहेबांकडे सादर करु.

**श्री.नितीन लढढा :-** आता मला सांगा की, तीनदा ही निविदा प्रक्रिया राबविली गेली. मजुर घेण्याच्या संदर्भात, वाहने घेण्याच्या संदर्भात. प्रभाग समिती क्र, २,३ व ४ मध्ये लॅटरीन साफसफाई करणे व मनपा वाहनांवर ड्रायव्हर भरणे, हे या निविदेच स्त्रोत होत. मला सांगा ही निविदा जवळपास ३ ऱ्यांदा रिकॉल झाली. तिनदा ह्या निविदा प्रक्रिया राबविल्या गेल्या. मगनंतर विधी सल्लागाराचा मत मागविण्याच साक्षात्कार हा पुर्वी का नाही झाला. ज्या वेळेला आपण वॉटरग्रेसला डिस्कंटीन्यु (Discountinue) न करता, पर्यायी व्यवस्था उभारण्याच्या दृष्टीकोनातुन निविदा प्रक्रियाचा खटाटोप चालविला. अत्यंत तातडीने म्हणजे रोज त्याच्या संदर्भातली बातमी वृत्तपत्रात राहायची की, वॉटरग्रेसला बंद करणार आणि पर्यायी व्यवस्थाची उभारणी करणार. मग त्यावेळेला निविदा प्रक्रिया राबवितांना की, वॉटरग्रेसला एक संधी दिल्याशिवाय ही प्रक्रिया राबविणे योग्य होणार नाही. असा संदर्भ पुर्वी का घेण्यात आला नाही. म्हणजे विस्तुत मध्ये येथे बोलाव लागेल.या निविदा ईच्छुक व्यक्तीच्या प्राप्त झाल्या नाही.या वेळेला अनउपचारीक चर्चेतुन कळले. या निविदा प्रक्रिया मध्ये एका क्ष व्यक्तीला निविदा मिळणार होत्या. परंतु त्या ईच्छुक व्यक्तीला ती निविदा स्पर्धा झाल्यामुळे, स्पर्धात्मक आलेले दर हे एक क्ष व्यक्तीपेक्षा कमी आहे आणि म्हणुन ही निविदा प्रक्रिया, मी सभापती राहुन चुकलेलो आहे, महापौर ही राहुन चुकलेलो आहे, आणि २५ वर्षाचा आयुक्त हा या महानगरपालिकेच्या सभागृहात गेलेला आहे. वकीलाचा सल्ला वेळोवेळी कश्या पध्दतीने मिळविल्या जातात, ते चांगल्यासाठी ही मिळविल्या जातात आणि ते वाईटासाठी सुध्दा मिळविल्या जातात. प्रक्रिया सरळ करण्यासाठी सुध्दा मिळविल्या जातात, प्रक्रियेत खडा टाकण्यासाठी सुध्दा मिळविल्या जातात. अश्या पध्दतीने ती निविदा प्रक्रिया, मला त्याच्याशी काही घेणेदेणे नाही. निविदा मध्ये कोण लोयेस्ट असत, कोण हायेस्ट असत.निविदा प्रक्रिया पारदर्शक पध्दतीने पार पडली असती. आणि जे सर्व वक्तव्य उपायुक्त महोदय सांगत आहे. त्याच्यात कायदेशीर अडचण येईल असा वकीलांनी सल्ला दिला. प्रशासन त्यावेळेला झोपलेले होते कां, निविदा प्रक्रिया करतांना प्रशासनाने आधी विधी शाखेचे मत घेतले असते मग वार्ड अधिकाऱ्याला सांगितल असते की, अश्या परिस्थिती मध्ये नविन मक्ता मागविण्याच्या अनुषंगाने कायदेशीर अडचणी निर्माण होऊ शकता. आणि ते निर्माण होऊ नये म्हणुन वॉटरग्रेस कंपनीला एक अंतिमत: संधी देणे कायद्याच्या दृष्टीकोणातुन महानगरपालिकेच्या हिताच आहे. कदाचित त्या वेळेला पदाधिकाऱ्यांनी एकल ही असत. परंतु या सगळयाही गोष्टी कुठेतरी पांघरु न टाकण्याच्या दृष्टीकोणातुन अश्या पध्दतीचा खटाटोप जो आहे ना हा संशयाला जागा निर्माण करतो. कुठलीही प्रक्रिया जी आहे ती पारदर्शक व्हावी. शेवटी स्पर्धा आहे, स्पर्धेमध्ये हे घेईल, तो घेईल, मी घेईल कोणीही घेईल. परंतु कमीत कमी प्रक्रिया जी आहे ती पारदर्शक असायला पाहिजे. परंतु याच्यामध्ये वॉटरग्रेस पासुन तर आता पर्यंत चालत आलेली सद्यास्थितीतली व्यवस्था, ही संपुर्णत: अपारदर्शी आहे. आणि एखाद्या कोट्यावदी रुपयाचा ज्या वेळेला खर्च महानगरपालिका करते. आणि त्याच्या मध्ये पारदर्शकता नसणे, ती अत्यंत गंभिर स्वरु पाची अनियमित्ता आहे. ठिक आहे. प्रशासन असो किंवा बॉडी असो, नियमानुसार बसवायच म्हटल तर नियमानुसार बसविल जाऊ शकतो. आणि नाही बसवायच असल तर त्याच्यासाठीपण पर्याय असतात. तर या पध्दतीने अश्या चुकीच्या पध्दतीचे प्रक्रियेच अवलंब करु न हा जो प्रकार चाललेला आहे मला वाटत अत्यंत चुकीचा प्रकार आहे. या संदर्भात जो काही निर्णय घ्याचा असेल. वॉटरग्रेसला संधी द्यायची असेल तर द्यावी. रद्द करायच असेल तर तातडीने रद्द कराव. आलेल्या निविदा ओपन करायच्या असतील तर ओपन करा. मला सांगा तीन तीन चार चार मक्तेदार, १५-१५ लाख डिपॉझिशन त्यांचे आहे. तुम्ही त्याच्यावर कुठलाच निर्णय घेत नाही. किंवा सादा पत्र सुध्दा काढु शकत नाही की, तुमची निविदा आम्ही स्विकारु शकत नाही या या कारणाने आम्ही हे निविदा रद्द करत

आहोत, तुमचा डिपॉझिट परत घेऊन जावा. मुर्ख समजतो का आपण मक्तेदारांना, १०-१०, २०-२० लाख रुपये तुम्ही डिपॉझिट अटकऊन महानगरपालिकेत तो भिकाऱ्या सारखे चकरा मारेल. आणि येथे आपण मक्तेदाराला कुठलेही पी.एफ.चे कागदपत्र न तपासता, कोणाला एक अटीशर्तीचा अवलंब करतो, दुसऱ्याला दुसऱ्या अटीशर्तीचा अवलंब करतो. अश्या पध्दतीने या मुळे काय होत की, या महानगरपालिकेमध्ये निकोपस स्पर्धा होत नाही. चांगले दर्ज्याचे मक्तेदार येथे येण्यासाठी धजावतात.आणि जे मक्तेदार आहे त्या मक्तेदारांकडुन निकुष्ट प्रतीची कामे करावी लागतात. आणि या शहराच्या जनतेच्या पैश्या मधुन या कामावर पाणी फेरले जाते. आपण बघा वेगवेगळया कामांमधले, आता परवाच नितिन भाऊंनी काही फोटोग्रॉफ्स दाखविले मक्तेदारांचे कामाचे. नविन गटारी ज्यांचे बिल सुध्दा अदायगी झालेले असतील, त्यांच्या आसाऱ्या सगळया डोळयाने दिसत आहे. डिव्हायडर पाहाल तर तो कसा नागमोडी डिव्हायडर आहे. त्याच्या साईडच्याही आसाऱ्या दिसत आहे. त्या आसाऱ्यांना सिमेंट लावण्याची सुध्दा तजविज मक्तेदार घेत नाही. मग अश्या पध्दतीने पैसा फक्त या मक्तेदारांवर रिता करायचा असेल तर सांगुन द्या सगळया सदस्यांना की, आपण कुठलाही डोक्याला ताण घ्यायचा नाही. कुठलाही अभ्यास करायच नाही. कुठलीही पाहणी करायची नाही. आम्हाला मिळालेला पैसा आहे. आम्ही या पध्दतीने खर्च करणार आहोत. त्या भुमिका स्पष्ट करुन टाका, कशाला लोकं कागदपत्र जमा करतील, कशाला फोटोग्रॉफ्स काढत बसतील. ज्या विश्वासाने या शहराच्या लोकांनी या सदस्यांना निवडुन दिलेल आहे.त्यांच्या काही अपेक्षा आहे. मक्तेदाराने निश्चितपणे दोन पैशे कमवावा. त्याच्या बद्दल दुमत नाही. परंतु कमीतकमी त्या कामाचा दर्जा, त्याची गुणवत्ता ५-१० वर्ष टिकुन राहील एवढी तरी काळजी घ्यायला पाहिजे. याच्या बाबतीत माझा गंभिर आक्षेप आहे. मी आरोप करत नाही आज, कारण शेवटी परिस्थिती जी आहे ती आरोग्याशी निगडीत आहे. मी आरोप करत नाही परंतु आक्षेप आहे की अत्यंत चुकीच्या पध्दतीने राबविण्यात आलेली ही प्रक्रिया आहे. म्हणजे जेथे निविदा मागविल्यानंतर निविदा उघडल्या जात नाही. कुठल्या तरी जुन्या ठेकेदाराला कुठल्यातरी मंजुर दरात काम देणे, म्हणजे तिकडे वॉटरग्रेसला ही निगडीत ठेवायच इकडे जे आलेले निविदा आहे त्यांना ही निगडीत ठेवायच आणि इकडे कोणाच तरी पोट भरायच हा प्रकार जो आहे अत्यंत निंदणीय आणि घाणेरडा प्रकार आहे. माझ स्पष्ट म्हणणे आहे की, जो पर्यंत या संपुर्ण गोपणीयतेचा निवाडा होत नाही तो पर्यंत या मक्तेदाराला एक रुपयाची सुध्दा बिलाची अदायगी करण्यात येऊ नये. कारण या सर्वांच्या पी.एफ.ची जबाबदारी मुख्य एजन्सी म्हणुन महानगरपालिका आहे. उद्या यांचे कधी काही कमी जास्त झाल तर उद्या याची लायबेलीटी आपल्यावर येईल. आपण मक्तेदाराची तपासणी न करता की त्यांच्या खात्यात पैसा जात आहे की नाही. महानगरपालिकेकडुन बिलांची अदायगी होते पण मजुरांच्या हातात पुरेसा पैसा मिळत नाही. कोणाचा शोषण करतो आहे आपण त्या कामगारांचा शोषण करतो आहे. तो पहिलेच शोषीत वर्ग आहे, उपेक्षित वर्ग आहे. तो कोणत्या अवस्थेमध्ये काम करतो आणि आपण त्यांचा शोषण करुन आपण आपला खिसा भरायचा हे अत्यंत घानेरडा आणि निंदणीय प्रकार आहे. आपण गांभिर्याने चौकशी करावी तो पर्यंत कुठल्याही मक्तेदाराचा एक रुपया अदा करण्यात येऊ नये ही माझी प्रशासनाला नम्र विनंती आहे.

**मा.आयुक्त :-** या पुर्वीची आपली जी एजन्सी आहे. ही एजन्सीचा मक्ता रद्द करणे संदर्भात निर्णय व्हायच्या संदर्भात मध्ये ते अतिशय तिव्र स्वरुपाचे आहे. याच्या मध्ये सन्मा.सदस्यांच्या भावनां मागचे जे उद्देश आहे. तो स्पष्ट आहे. महानगरपालिकेचा जो निधी आहे योग्य पध्दतीने योग्य कारणासाठी आणि योग्य ठिकाणी खर्च झाला पाहिजे. या आपल्या भावनाशी आम्ही सहमत आहोत. तत्कालीन जी परिस्थिती उद्भली त्या परिस्थितीची तपशीलवार माहिती उपायुक्तांनी दिली.आपण सर्व सन्मा.सदस्यांना ती पार्श्वभुमी माहिती आहे.वॉटरग्रेस कंपनीचा ठेका रद्द करण्याच्या संदर्भामध्ये प्रशासकीय कार्यवाही चालु आहे. त्याच्या संदर्भामध्ये आपण त्याला अंतीम नोटीस दिलेली होती. त्या नोटीस मध्ये ज्या पार्श्वभुमीवर त्यांचा ठेका रद्द करण्याचा निर्णय घेतलेला आहे कोणी केलेला आहे त्याची सर्व पार्श्वभुमी यात आहे. त्याच्या उत्तरामध्ये त्यानी काही वस्तुस्थिती आपल्या निदर्शनास आणुन दिलेली आहे. ज्याचे उत्तर देणे आपल्याला नैसर्गीक न्यायतत्वावर आपल्या बंधनकारक आहे. यात त्यानी आपल्याला वकीला मार्फत नोटीस पाठविलेली आहे. ज्यात त्यानी अस म्हटलेल होत की, याच्या बाबतीत आम्ही उच्च न्यायालयात दावा दाखल करु.आता पर्यंत आपल्याला न्यायालयाची कुठलीही नोटीस आलेली नाही. परंतु न्यायालयामध्ये दावा दाखल केलेला आहे या संदर्भात फिगर नोटीसच्या संदर्भात आपण हा सगळा विषय आपले महानगरपालिकेचे विधी सल्लागारांकडे सोपविला होता. उपायुक्तांच्या सांगीतल्या प्रमाणे ऑडीटर, उपायुक्त, मी आणि आपले विधी सल्लागार आम्ही या विषयावर चर्चा ही केलेली होती. याच्या मध्ये आपल्याला जी पुढची कार्यवाही करायची आहे. त्याच्या मध्ये जी वस्तुस्थिती आहे त्याच्या पार्श्वभुमीवर आपण हे ठेका डिपोर्ट केलेला आहे. आणि रद्द करण्याचा आपल्या हक्क ही आहे. या मध्ये आपण घेतलेला कुठलाही निर्णय कायद्याच्या चौकटीमध्ये बसलेला असावा. जेणे करुन याच्यामध्ये जर काही डिस्प्युट निर्माण झाला, तर महानगरपालिकेवर कुठल्याही प्रकारची लायबलीटी येऊ नये. जर एखाद्या कामाला वेळ लागला तरी ते कायद्याच्या पुर्ण चौकटीत बसलेला असेल. नाही तर भविष्यामध्ये त्याचे काही वाईट परिणाम आपल्याला भोगावे लागणार. तर त्याला आपण सुनावणीसाठी दोन तारखा दिल्या

दुसऱ्या सुनावणी मध्ये लॉकडाऊनमुळे त्याला नाशिक वरुन येता आले नाही. आता तिसऱ्या लॉकडाऊन मध्ये त्यांना पत्र देऊन पोलिसांच्या परवानगीने ते स्वत: येथे आले. एका वेळेस ते स्वत: आले नव्हते त्यांनी प्रतिनिधी पाठविलेला होता. मागची जर आपण पार्श्वभुमी बगितली तर जे स्वत: प्रोप्रायटर आहे त्यांच्याशीच बोलण गरजेच होत. निर्णय घ्यायची क्षमता त्यांच्याकडे आहे. त्यांचा प्रतिनिधी निर्णय नाही घेणार फक्त आपला मॅसेज त्यांना पोहचविला. त्यामुळे त्यांच्या उपस्थिती मध्ये हा निर्णय होण्यासाठी आपण त्यांची उपस्थिती गृहीत धरली होती. त्या प्रमाणे त्याचे प्रोप्रायटर सुध्दा येथे आले होते. त्यांच म्हणणे काय आहे त्यांनी मांडलेला आहे. आणि त्याच्यावरती आपण पुढची प्रक्रिया सुरु केलेली आहे. यात एक गोष्ट लक्षात घ्यायची आहे की, ज्या काही त्यांच्या कामात त्रुट्या होत्या ते दोन स्वरुपाच्या होत्या. एक आपण सांगितले की, कामगार कायद्याचा पालन ते १००% झालाच नाही. ते कायदाच झाला तर ते करारनाम्या मध्ये असो किंवा नसो कारण तो कायदाच झाला आहे. त्या प्रमाणे कामगारांचा ई.एस.आय. असेल, पी.एफ. असेल. काही पगार बँक खात्यात जमा करावे. या सर्व गोष्टी त्याच्या मध्ये होत्या. आता बँकेत खाता ओपन करत असतांना पी.एफ. ओपन करत असतांना किंवा ई.एस.आय.चे खाते ओपन करत असतांना त्यांचे के.वाय.सी. साठी जे कागदपत्र लागतात ते सर्व कागदपत्र कामगारांकडुन इच्छाप्रमाणे उपलब्ध होऊ शकत नव्हती ही वस्तुस्थिती आहे. साधारणत: २५४ कर्मचाऱ्यांचे खाते त्यांनी ओपन केलेले आहे. आणि बाकीच्यांचे जसे ही खाते ओपन होतील तर त्यांच्या खात्यामध्ये आम्ही जमा करु. आम्ही महानगरपालिकेला जे काही पॅनलटी दिलेली आहे, सर्व वाहने तेथे लावलेले आहे. दैनंदिन कचरा घंटागाडीद्वारे जमा करणे, रोडवर पडलेला कचरा इतर वाहनांमध्ये जमा करणे आणि ४०० कामगार आपल्याला गटार व रस्ते साफसफाईसाठी देणे. याची पुन्हा त्यांनी आम्हाला लेखी हमी दिली की, आम्ही पुन्हा हे करु. याची जी पार्श्वभुमी आहे त्याचा पुर्वीचा इतिहास पाहता, आपण त्याच्या एका पत्रावर विश्वास ठेवायचा का ? हा एक मोठा प्रश्न आहे. अश्या परिस्थितीमध्ये आपल्याला ते निर्णय घ्यावा लागणार आहे. आणि आपण ते निर्णय युध्दपातळीवर घेणार आहे. दरम्यानच्या काळामध्ये उपायुक्ताने सांगितले प्रमाणे, ५ किंवा ६ मार्चला जेव्हा जळगांवात त्याचे पुर्ण कामकाज बंद झाले. त्याच्या मध्ये नुकतेच कुठेतरी ही कोरोनाची चर्चा चालु झाली. १३ मार्चला आरोग्य संघटनेने हे महामारी म्हणुन जाहिर केली. आणि आपल्याकडे तसा प्रतिबंधक कायदा संपुर्ण देशात लागु केला. आता अश्या पार्श्वभुमी मध्ये आपण त्यांच्या कडुन ठेका काढुन घेतल्यानंतर आपल्याला तातडीने उपाययोजना करणे गरजेचे होते म्हणुन तत्कालीन आयुक्त यांनी स्वत: याच्यामध्ये काय पर्यायी व्यवस्था करता येईल. तर एक तर आपल्याला १४ व्या वित्त आयोगात हा खर्च करता येतो. तसा धोरणात्मक निर्णय आपण दि.१६/०४/२०२० च्या महासभेत याचा ठराव आपण केला. घनकचरा व्यवस्थापनाशी संबंधीत जे काही महानगरपालिकेचे काम असेल त्यांना प्रशासकीय मान्यता देणेचे अधिकार आयुक्तांना आहे. कारण याच पार्श्वभुमीवर हाच निर्णय घेतला गेला, महानगरपालिकेचे वाहने वापरुन आपण त्यावरती २५० कामगार ठेकेदारामार्फत लावावे. आता ठेकेदारासाठी दोन गोष्टी पाहिजे होत्या. एक आपल्याकडे जर एखादा साफसफाई करणार कॉन्ट्रॅक्टर असेल, किंवा तो ठरावात बसत असेल, म्हणजे जुना म्हणत नाही मी. तर त्या ठरावाच्या आधारे आपण काही कामगार त्याच्याकडुन घेऊ शकतो. नाही तर आपण नव्याने निविदा प्रक्रिया राबवु शकतो. आणि त्या प्रमाणे निविदा प्रक्रिया राबवली. असे करत असतांना त्या वेळेला दोन निर्णय घेतले गेलेले आहे असे दिसते. एक तात्पुर्त्या स्वरुपामध्ये बांधकाम ठेक्याचे जे मंजुर दर आहे. आणि स्थायी समिती मध्ये मंजुर नोव्हेंबर २०१९ चा जो ठराव आहे. त्या प्रमाणे बांधकामसाठी लागणारे कामगारांचा हे रु.५२०/- प्रमाणे दर मंजुर केलेला होता. त्याप्रमाणे मंजुर एजन्सीकडुन दुसऱ्या दिवसापासुन हे काम सुरु केले. आता त्यावेळेला आपण प्रभाग क्र.३ साठी निविदा प्रक्रिया राबविली होती. निविदा आल्या निविदा उघडल्या सुध्दा. त्याच्या मधली जी दोन लिफाफा पध्दत आहे. त्यांच्या मध्ये लिफाफा क्र.१ जो तांत्रिक लिफाफा आहे तो उघडायलाही मान्यता दिली होती. दरम्यानच्या काळामध्ये मी आगोदर सांगितल्या प्रमाणे जी काही त्याची लिगल नोटीस आपल्याला आलेली आहे. त्याच्या पार्श्वभुमीवर ती आपण वकीलांकडे दिली. आपल्याला ही याची शंका निश्चितच होती की, ज्या कामासाठी हा ठेका दिलेला आहे. त्याच्याशी ४-५ वर्षाच कॉंट्रक्ट केलेला आहे. त्याला कॉंट्रक्ट ॲक्टचे सर्व तरतुदी लागु झालेले आहे. हे म्यॉचवली बाईडींग आहे जसं त्याच्यावर बाईडींग आहे तसच आपल्यावर ही बाईडींग आहे. एका कामाच एकाशी कॉन्ट्रक्ट करुन ते कॉन्ट्रक्ट रद्द न करता,त्याच कामाच दुसऱ्याशी कॉन्ट्रक्ट करणे हा थोडासा ब्रीच ऑफ कॉन्ट्रक्ट होऊ शकतो. म्हणुन महानगरपालिकेने नविन निविदा किंवा नविन कॉन्ट्रक्ट करण्याचा विषय हा वॉटरग्रेसचा अंतिम निर्णय झाल्यावर घ्यावा असा लिगल ओपिनियन त्या वेळेलाही होता आणि आता ही उपायुक्तांनी सांगितल. आता निविदा ज्या स्टेजवर आलेली आहे त्या स्टेजच्या परिस्थिती मध्ये ही निविदा प्रक्रिया पुढे घेऊन जाणे हे आपल्या महानगरपालिकेच्या रजिष्ट्रेशनला दिसतील. आणि ते योग्य नसल्यामुळे ती निविदा घेतली नाही. आता आपण जे मुद्दा मांडला याच्यामध्ये की, निविदा प्रक्रियेत कुठलाही फायनंशियली बिड ओपन केलेल नाही. त्यामुळे कोणी भाग घेतलेले आहे ते आपल्याला क्लियर आहे पण कोणाचे भाव कमी आहे कोणाचे भाव जास्त आहे हे माहित नाही. ठेका

कोणाला मिळेल कोणाला मिळु शकणार नाही. निविदा ओपन झाल्यानंतर समजेल. तरी कृपया शंका नका ठेवा ही माझी विनंती आहे.

**श्री.नितीन लढढा :-** कस आहे सर, मी सांगितले ना की, या सर्व बाबींमुळे शंकेला जन्म घातल जात. प्रशासनाशी काही संबंध नाही त्याच.

**मा.आयुक्त :-** ही निविदा काढतांना आपण सर्व प्रक्रिया रिपेअर केलेली होती. त्याबाबत आपल्या काही मा.सभासदांकडुन अश्या प्रकारचे निर्देश प्राप्त झालेले आहे की, त्याच्या अटीशर्तीबाबत काही सन्मा.सदस्यांच्या सुचना म्हणा किंवा आक्षेप म्हणा. यात आपण जी निविदा प्रक्रिया राबविली होती ती २ वर्षासाठी राबविलेली होती. आपण जे ३ प्रभाग समित्यांसाठी मक्तेदार नेमणार आहोत. तर काही सन्मा.सदस्यांचे अटीशर्ती बदलाव्यात अशा सुचना होत्या. ३ प्रभागाकरीता एकच मक्तेदार नेमणार आहात. वॉटरग्रेस सारखे होऊ नये म्हणुन एका प्रभागात एकच मक्तेदार नेमावा. असे आपण ठरवले. दुसरी सुचना अशी होती की, वॉटरग्रेसच्या बाबती आपण ५ वर्षाचा मक्ता दिलेला आहे. तसे न करता पर्फार्मंस बेस मक्ता पहिल्या ६ महिन्या करीता आपण केलेले आहे तर आपल्याला योग्य वाटला तर पुढचे ६ महिने देऊ. एक वर्ष योग्य वाटला तर पुढचे सहा महिने देऊ. तसे हे २ वर्षा करीता आहे. करार हा २ वर्षाकरीता राहील परंतु त्याच रिव्हीयु ६-६ महिन्यानंतर होईल. उद्या असे काही होऊ नये की, हे तुम्ही सगळ बिझनस माईंडने केलेल आहे. तुम्हाला माझा ठेका रद्दच करायच आहे म्हणुन तुम्ही दुसऱ्या मक्तेदारास काम दिले असे तो म्हणुन शकतो. असे होऊ नये म्हणुन आपण या सर्व निविदेंवर वकीलांचा सल्ला घेण्याचा योग्य निर्णय घेतलेला आहे. उद्या आपल्याला वॉटरग्रेसचा ठेका रद्द करुन दोन पर्याय आहे. एक इन हाऊस स्वत:चे वाहने आहे स्वत:चे कर्मचारी वापरुन करु शकतो किंवा पुर्वी जसे आपण प्रस्ताव मांडले होते महासभेमध्ये तसे पुढच्या कालावधीसाठी आपण एजन्सी नेमुन घेऊ शकतो. मधल्या काळात कोविडची परिस्थिती येणाऱ्या काळात साचलेला कचरा ते विचारात घेता. हे धोरणात्मक निर्णय स्थायी समितीने मंजुर केलेले दर, वित्तीय आयोगाने काढलेले शासनाचे आदेश, शहराच्या विकास कामाच्या दृष्टीने महानगरपालिकेने तो निर्णय घेतलेला आहे. याच्या मध्ये महानगरपालिकेचा आर्थिक नुकसान होऊ नये. शहरातील स्वच्छतेची परिस्थिती नियंत्रणात राहवे. कुठल्याही कायद्याचे अटीवर त्यांनी बोट ठेवु नये. या सर्व गोष्टींचा विचार करुन आपण ते निर्णय घेतलेला आहे. सर्व सभासदांनी या निर्णयाशी सहमत असावा अशी माहिती देण्यात येत आहे.

**श्री.नितीन लढढा :-** त्याला कुठेतरी टाईम द्यावा लागेल अन्यथा त्याला दिलेली अंतीम संधी आणि त्या संधीला तो प्रतिसाद देत नाही. त्या नियमांच्या अनुषंगाने रद्द करावे म्हणजे जो काही निर्णय घ्यायचा असेल त्याला कन्टीन्यु करण्याच्या संदर्भात निर्णय असेल किंवा त्याला रद्द करण्याच्या संदर्भातली प्रशासनाची भुमिका असेल. त्याला कुठेतरी वेळेच्या बंधनामध्ये बांधुन घ्यावे लागेल अन्यथा जसे अडीच महिने गेले पुन्हा ४-६ महिने असेच जातील आणि या सर्व गोष्टी शंका उत्पन्न करतात.

**मा.आयुक्त :-** हे जे दैनंदिन प्रशासकीय बाब आहे हे पुढे जायला नको हे मी मान्य करतो परंतु आता अश्या परिस्थितीत फक्त कोरोनाचा प्रतिकार करणेस गरजेचे आहे. पण जसे उपायुक्त साहेबांनी सांगितले तर आपण यावर निर्णय लवकरात लवकर घेऊ. परंतु एक याच्यात हे आहे की, शहराचा आरोग्य चांगला राखण्याच्या दृष्टीने मी निर्णय पारदर्शकपणे घेईल हे आपल्याला आश्वासन करतो. त्यासाठी प्रशासनाने सहकार्य करावे ही विनंती.

**श्री.नितीन लढढा :-** दोन दिवस आठ दिवसात नाही. परंतु या विषयाला लवकरात लवकर मार्गी लावा एवढीच आमची विनंती आहे.

**मा.आयुक्त :-** तक्रारी येत होत्या त्यामुळे आपले ट्रॅक्टर तसेच जे मंजुर ठेकेदार यांचे वाहनांकडुन कचरा उचलण्याचे काम केले होते. दरम्यानच्या काळामध्ये हा खर्च महानगरपालिकेला करावा लागु नये म्हणुन जे गाडया आपण घंटागाडीसाठी वापरासाठी घेतलेले होते पण वापरात येत नव्हते त्या आपण त्यांचा वापर करतो आहे. सद्यास्थितीत आपण ठेकेदाराचे कुठलेही वाहने घेत नाही. त्यामुळे आपले खर्च कमी झालेले आहे.

**श्री.चेतन सनकत :-** याबाबत आपण वकीलांचे अभिप्राय मागितलेले आहे. या मध्ये आम्ही वेळोवेळी चेकींग केलेली होती. त्याच्यामध्ये तो दोषी आढळलेला आहे. असे आम्ही प्रशासनाच्या लक्षात आणुन दिलेले आहे. आपल्याला कोर्टातुन कोणताही आदेश आलेला नाही. हे आपण स्वत: म्हटले आहे. खामगांवला त्याचा मक्ता बंद केलेला होता, नाशिकला त्याचा मक्ता बंद केलेला होता. मालेगांव मध्ये पर ट्रीप एक किनटल का एक टन असे गाडी मध्ये माती चिटकुन तो गाडी फिरवत होता. म्हणजे गाडी खाली झाल्यानंतर ही एक किनटल का एक टन त्या गाडीचे वजन होत होते. या सर्व बाबी करतांना तो तिकडे आढळला जळगांव मध्ये ही आढळलेला आहे. मी स्वत: माती भरलेला ट्रॅक्टर पकडलेला आहे. सन्मा.सदस्यांनी पकडलेले आहे. तो जर रिटर्न येत असेल तर त्याचे कडुन असे पुन्हा होणार नाही. आणि त्याचे हातपाय बांधुन कायद्याने की, अशी एकही चुक झाली तर तुम्हाला संधी देणार नाही. त्याला दुसरी संधी देतांना कागदावर लिहुन घ्यावे. अशी माझी सुचना आहे. कारण की, तो त्याच्या सवय बदलणार नाही. सर्व महानगरपालिकेत जिथे त्यानी काम केलेले आहे त्याची तुम्ही माहिती घेऊन घ्या. कागदावर घ्या. ऑन रिकॅार्ड घ्या. सर्व ठिकाणी त्याच काम बंद पडत आहे.

कर्मचारी विरोधात जात आहे. हे सर्व झालेले आहे आणि हे सत्य आहे. त्याला रिटर्न काम द्यायचा असल्यास कायद्याच्या चौकटीत बसुन द्या. पण त्याचे हातपाय असे बांधा की अशी काही चुक त्यांनी केली तर ऑन दि स्पॉट मक्ता रद्द करण्याचा निर्णय आपण घेऊ शकतो. कोर्टात जायचे त्याला अधिकार राहणार नाही. काही कर्मचाऱ्यांनी आत्मदहन करण्याचेही प्रयत्न केलेले आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** मा.सभापती व आयुक्त साहेब, जेव्हा मक्ता मंजुर करण्याचा विषय होता तेव्हा मी स्वत: महासभेमध्ये त्याचे प्रुफसहित मालेगांवचा असेल, नाशिकचा असेल, धुळयाचा असेल, जिथे ब्लॅक लिस्ट मध्ये गेलेला आहे, आयुक्त साहेबांनी पकडलेला आहे असे विविध त्यांच्यावरती दंडासहित कार्यवाही करत असतांनाचे जे प्रुफ दिले होते परंतु तरी ही त्याला मंजुर केल आणि त्यानंतर त्यानी जळगांवची वाट लावली. त्यानंतर सुध्दा जर आपण त्याला वेळोवेळी संधी देऊ तर नक्की जळगांवची परिस्थिती मागे जी झालेली होती त्याचप्रमाणे परिस्थिती होईल. आम्ही स्वत: त्याला माती भरतांना पकडलेले आहे. मी होतो, विरोधी पक्षनेते होते, शिवसेना महानगर प्रमखु, श्री.शरदभाऊ तायडे होते. आम्ही रस्त्याने येत होतो, आमच्या समोर डायरेक्ट मातीचा भुगुल जो झाडांना टाकण्यासाठी असतो वन विभागाच्या अधिकाऱ्याच्या घराबाहेरचा भुगुल त्यांनी गाडी मध्ये उचलुन टाकला, त्याचा विडिओ आहे साहेब. अजुन काय प्रुफ पाहिजे, त्याने काम केलेले नाही. परंतु आमची एक विनंती आहे की, नितिनभाऊंनी मांडल्याप्रमाणे आपण त्याच्यावरती योग्यरित्या निर्णय घेऊन येणाऱ्या काळात आपण त्याला किती दिवस लांबवणार. आजची परिस्थिती पाहता आज जर आपल्या वार्डात साफसफाई चांगली होत असेल, तेव्हाचा आणि आताचा फरक पाहिला तर आपल्या लक्षात येईल. हा मध्येच जे मक्ता ठेकेदाराला निविदा न काढता दिलेला आहे त्याचा निर्णय आपण लवकर घेतला पाहिजे योग्य रितीने कारण की सभागृहाला काही कळत नाही तर बाकीच्या जनतेला केव्हा कळेल. वॉटरग्रेसचा विचार करणे, मला वाटते त्याला संधी देऊच नाही. त्याच्याशी लढायची तयारी आपण ठेवावी. जेणे करुन आपल्या जळगांवची साफसफाई चांगल्या प्रकारे होईल.

**श्री.चेतन सनकत :-** आयुक्त साहेब मी जे बोललो, त्याच हे उदाहरण पहा. (मोबाईल मध्ये व्हिडिओ क्लिप दाखवली.) भविष्यात अशी परिस्थिती आपल्याकडे नाही उद्‌भवली पाहिजे.

**श्री.नितीन बरडे :-** साहेब, हे ६ महिनेत जर नाही झाले तर असेच चालेल का ?

**मा.आयुक्त :-** नाही, जसे लढढा साहेबांनी सांगितले, याला कालमर्यादा असावी. आणि पर्यायी व्यवस्था आपण काय करावी. महासभेत ठेवु हा विषय आपण. जस उपायुक्तांनी सांगितले की, ही तात्पुरती व्यवस्था आहे.दीर्घ काळासाठी चालु नये. या दृष्टीने आपण कामे करु या.

**श्री.नितीन बरडे :-** नाले साफसफाईचे काम सुरु आहे काय? किती दिवस राहिले पाऊसाळयाला, माझ्या वार्डात तीन मोठे नाले आहे. दोन मुल वाहुन गेलेले आहेत.

**मा.आयुक्त :-** जे पाच मोठे नाले आहे त्यासाठी आपण निविदा प्रक्रिया राबविलेली आहे. पहिल्या निविदेला रिस्पॉन्स आलेला नव्हता, दोन वेळा मुदतवाढ घेऊन तिच निविदा मागविलेली आहे. आज त्याचा शेवटचा दिवस आहे. आजच्या शेवटच्या तारखेपर्यंत त्यात रिस्पॉन्स मिळणे अपेक्षित आहे आपल्याला. प्रभाग समिती क्र.१ मध्ये जे कोटेशन दिले. त्यांची कामे सुरु झालेली आहे. आपला मुख्य लेंडीनाला जो आहे. त्यासाठी आपल्याला मशिनरी लागतात. तर कमी वेळेत मशिनरी लावुन आपण ते करुन घेऊ.

**श्री.नितीन बरडे :-** आज आपल्या शहरात दोन मोठे नाले आहे. त्यात एक समता नगरचा नाला आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** वेळ कमी आहे लवकर करा साहेब.

**मा.आयुक्त :-** निविदा आले की, आपण ताबडतोब त्याच्यावर निर्णय घेऊ.

**मा.सभापती :-** जे ही संविदा सभागृहासमोर येतात त्या संविदाबाबत प्रशासनाने सभागृहाला माहिती अवगत करुन द्यावी. कलम ७३ (ड) नुसार आयुक्तांना जे अधिकार आहे ते २५ लाखापर्यंत आहे. तर त्याच्यासाठी महापौरांची पुर्व परवानगी घेणे आवश्यक असते. याबाबत श्री.संतोष वाहुळे साहेबांनी सभागृहाला थोडी माहिती सांगावी.

**मा.आयुक्त :-** सुचना चांगली आहे. पण कायद्या मधील तरतुद आणि प्रोसिजर याच्या मध्ये लॅक्युना नाही. २५ लाखाच्या आतील जे निविदा असता ते आयुक्त मंजुर करतात.२५ लाख ते ५० लाखापर्यंतची निविदा महापौरांची पुर्व परवानगीने आयुक्त मंजुर करु शकता. परंतु महापौरांना असे निविदा मंजुर करण्याचे २.५ कोटी पर्यंत अधिकार आहे. त्या अडीच कोटीला वेगळी स्थायी समितीच्या मान्यतेची सुध्दा गरज नाही. मा.महापौरांची अडीच कोटीची मर्यादा संपली की, मग २५ लाखाचे निविदा स्थायी समितीकडे आले पाहिजे.

**मा.सभापती :-** हे जे अडीच कोटी आहे याची नोंदी आपल्याकडे कुठेच नाही.

**मा.आयुक्त :-** अर्थ विभागात नोंदी ठेवलेल्या असतात. पये रु

**श्री.नितीन लढढा** :- अडीच कोटी रुपये कसे काऊंन्ट करणार ?

**मा.आयुक्त :-** मी हा नियम पाहत आहे की आपल्या महापालिकेमध्ये अडीच कोटीच्या मर्यादे मधले सुध्दा सर्व निविदा या महापौरांच्या पुर्व परवानगीने स्थायी समितीकडे येतात. असे आहे. पण अडीच कोटी पर्यंतच्या निविदांना महापौरांना स्वतंत्र अधिकार आहे.

**श्री.नितीन लढढा :-** अधिकार दिलेले आहे. परंतु नियमानुसार स्थायी समितीच्या मान्यतेनेच ते मार्गी लागतील.

**मा.आयुक्त :-** अडीच कोटी पर्यंत महापौर करु शकता, म्हणजे अडीच कोटी पर्यंत त्यांना स्थायी समितीच्या मान्यतेची पुन्हा गरज नाही. आपण आपल्या कार्यपध्दतीमध्ये स्थायीची मान्यता घेत आहे काही हरकत नाही. परंतु तसे म्हटल तर महापौरांना अडीच कोटी पर्यंतचे मर्यादा आहे.

**मा.सभापती :-** विषय क्र. ३ आणि ४ बद्दल आपले मुख्यालेधिकारी काही महत्वाची माहिती आपल्या लक्षात आणुन देत आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आज या कोरोनाच्या मध्ये, नक्की ही मिटींग झाली पाहिजे की नाही झाली पाहिजे सोशल डिस्टंसिंगच्या आधारे असा संभ्रम सर्वांना होता. मी आज खरं अभिनंदन नगरसचिव यांना सभागृहात मानु ईच्छितो, आज आल्या बरोबर त्यांनी आणि त्यांच्या सहकार्यांनी हॅण्डग्लोज असतील मास्क असतील आणि निरजंतुकीकरण चांगल्या प्रकारे व सोशल डिस्टंसिंगच प्रमाण चांगल्या पध्दतीने पालन केले तर नगरसचिव आणि त्यांचे सर्व सहकार्यांच अभिनंदन मी येथे मांडत आहे.

**श्री. दिलीप पोकळे :-** माझा प्रभाग क्र. १ चा जो भाग आहे तो वाढीव भाग आहे. तर माझ्या भागात कर्मचारी वाढुन मिळावे.

**मा.आयुक्त :-** सहा.आयुक्त, याबाबत संपुर्ण माहिती घेऊन कार्यवाही करावी. गरज असल्यास सन्मा.सदस्यांशी ही संपर्क करावा.

**मुख्यलेखाधिकारी, श्री.कपील पवार :-** विषय क्र.३,४,५ आणि ६ बाबत सांगु इच्छितो की जे आपले अर्थ विभागाच्या गुंतवणुकी आहे. ती गुंतवणुक करण्यासाठी स्थायी समिती समोर मान्यतेसाठी आलेली आहे. परंतु बँकांचे जे व्याजदर असतात ते दिवसंदिवस बदलत असतात. आताचा जो व्याज दर आहे ५.९०% असा आहे जर तो एक दोन दिवसात बदलला असता तर आपला लॉस झाला असता. माझी सभागृहाला विनंती आहे की, हे अधिकार आपण आयुक्तांना दिले तर कोणतीही गोष्ट आम्ही आयुक्त व सभापतींशी डिस्कस करु न जे उच्च व्याजदर असेल त्यात गुंतवणुक करु . यात महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणार नाही याची आम्ही काळजी घेऊ.

**श्री.नितीन लढढा :-** नक्की योग्य विषय आहे. परंतु मागच्या वेळेला काय झालं की, काही खाजगी बँकेत गुंतवणुक झाली आणि ज्या वेळेला आपले खाते सिल झाल्यानंतर ते रिलिज करण्याच्या संदर्भात खाजगी बँकांनी खुप त्रास दिला होता. आपण आता भुमिका जी घेतली ती योग्य आहे. आपली महानगरपालिकेची गुंतवणुक ही नॅशनलाईज बँकेतच व्हायला पाहिजे. आपला प्रस्ताव योग्य आहे. सर्व बँकांचे जे दर मिळतील त्या योग्य दर मागुन गुंतवणुक करावी आणि हे अधिकार आपण आयुक्तांना प्रदान करतो.

**श्री.कपील पवार,मुख्यलेखाधिकारी :-** धन्यवाद.

**मा.सभापती :-** ही जी गुंतवणुक आहे नॅशनलाईज बँकेतच व्हावी अशी दक्षता घ्यायची आहे आणि या सर्व अटीशर्तीना अधिन राहुनच आयुक्तांना हे अधिकार प्रदान करण्यात येत आहे.

**मा.आयुक्त :-** आता मागच्या पाच सहा महिन्यांमध्ये राज्य शासनाने हे धोरणात्मक निर्णयच लागु केलेले आहे सर्व शासकीय कार्यालयांना व महानगरपालिकांना की, फक्त नॅशनलाईज बँकांमध्येच आपण पैसे ठेवु शकतो. अगोदर चार हाती बँका ज्यांच नेट कॅपीटल पाच हजार कोटी पेक्षा जास्त आहे अश्या बँकांना केंद्र शासनाने परवानगी दिली होती. पुर्वी काही बँकांना परवानगी दिली होती. जसे एच.डी.एफ.सी. बँक, ॲक्सीस बँक, आय.सी.आय.सी.आय.बँक परंतु आता फक्त नॅशनलाईज बँकाच आहे.

**श्री.नितीन बरडे :-** अमृतचे योजनेचे काम चालु आहे तेथे आपले कर्मचारी हजर असले पाहिजे कारण ते लोक जे.सी.बी.ने कुठेही खोदकाम करतात.

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** हो, असायला पाहिजे. ती त्यांची जबाबदारी आहे.

**श्री.नितीन बरडे :-** साहेब काय होते माहित आहे का तुम्हाला, कालचाच विषय सांगतो तुम्हाला, आपले कर्मचारी तेथे नसतात. ज्यांच काम चालु आहे त्यांना जुन्या लाईनी माहित नाही. जे.सी.बी.ने ते लाईनी फोडतात. माती त्या लाईनीत जाते. ते त्या लाईनी तसेच जोडतात. काल पाणी आलेल होत. कमीतकमी ८ घरांना पाणी मिळाले नाही. आज ही फिरत असतील ते की, कुठे ती माती अडकलेली आहे.

**मा.सभापती :-** अमृत योजनेचे काम चारही प्रभागामध्ये चालु असते, त्या ठिकाणी आपल कर्मचारी असायलाच पाहिजे. तरी आयुक्त साहेबांनी या गोष्टीवर थोड लक्ष द्याव.

**श्री.नितीन बरडे :-** कमीत कमी त्या प्रभागातला व्हॉलमन त्या ठिकाणी हजर असायला पाहिजे.

**श्री.नितीन लढढा :-** सुप्रीम कॉलनी हा उंचीचा भाग आहे. तेथे पाणी पुरवठा सुरळीत होणेस व्यत्यय येतो. तरी तेथे एक फायरची गाडीला आदेश करुन दररोज एक पाण्याचे टँकर पुरविणेत यावे.

**श्री.चेतन सनकत :-** आपला जो शामाप्रसाद मुखर्जी उद्यान आहे त्या ठिकाणी मजुर झोपलेले राहतात. दोन वेळा मी स्वत: डोळयाने बघितलेल आहे. त्यांना काम नसेल तर त्यांना जबाबदारी द्या कुठेतरी.

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** शामाप्रसाद मुखर्जी उद्यानाला मजुर नाही. लेडीज आहे तेथे फक्त तेथे वॉटर डिपार्टमेंट पण आहे. बाधकाम विभाग पण आहे आणि आरोग्य विभाग पण आहे. असे तीन डिपार्टमेंट आहे तेथे वॉचमन आहे, एक दिवसपाळीला वॉचमन आहे एक रात्रपाळीला वॉचमन आहे.

**श्री.चेतन सनकत :-** जर असे काही रिकामे कामगार असतील तर आपल्याला कोरोनासाठी कामात येतील.

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** आता चार दिवसापुर्वीच मी तेथे पाहणी केली तर सर्व मजुर त्या ठिकाणी हजर होते. तरी पण पाहणी करुन घेईन.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.२५३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१३६ दि.०५/०३/२०२० अन्वये १४ वा वित्त आयोगा अंतर्गत स्वच्छ भारत अभियान करिता ५०% अनुदानातुन जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.१५ व १९ मेहरुण अंतर्गत सार्व.शौचालयाची दुरुस्ती करणे कामी मक्तेदार श्री.स्वप्नील नरेंद्र चौधरी यांचे निविदा रकमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.८,१६,९८३/- मात्र खर्चाची संविदा.

२. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१३७ दि.२०/०३/२०२० अन्वये जळगांव शहरातील डांबरी रस्ते पॉटहोल मशिनच्या सहाय्याने दुरुस्ती करण्याकरीता इमल्शन डांबर पॅक डब्यात शासकीय दराने हिंदुस्थान कोलॅस प्रा.लि.मुंबई यांचे कडुन ३० मॅट्रीक टन पॅक डब्यात इमल्शन शासकीय दरानुसार खरेदी करणे कामी येणारा रक्कम रु.११,०३,५५० + वाहतुक खर्च रक्कम रु.१,०१,७४५ असा एकुण रु.१२,०५,२९५/- मात्र खर्चाची संविदा.

३. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१४२ दि.२४/०३/२०२० अन्वये जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत जळगांव शहरातील डांबरी रस्ते दुरुस्ती कामी आवश्यक विविध प्रकारची खडी पुरविणे मक्तेदार शिवशक्ती कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेपेक्षा ८.८०% कमीचे दर सर्वात कमीचे स्विकारुन रक्कम रु.२२,५७,६५४/- मात्र खर्चाची संविदा.

४. प्रशासकीय आदेश क्र./१६६२ दि.२८/०३/२०२० अन्वये दैनंदिन रस्ते व गटार साफ सफाई करिता ३२ दिवसांसाठी प्रती दिवस ४०० कामगार प्रती कामगार खर्च रु.५२०/- याप्रमाणे कामगार पुरविणे कामी मक्तेदार एस.के.कॉन्ट्रक्टर,जळगांव यांचे एकूण खर्च ६६,५६,०००/- मात्र खर्चाची संविदा.

५. प्रशासकीय आदेश क्र.१२ दि.२६/०३/२०२० अन्वये महानगरपालिकेच्या विविध वार्ड मध्ये घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत कामगार व ट्रॅक्टर पुरविणे कामी येणारा एकूण खर्च रक्कम रु.५५,९९,१७०/- मात्र खर्चाची संविदा.

६. प्रशासकीय आदेश क्र.१६७३ब दि.३०/०३/२०२० अन्वये दैनंदिन घरोघरचा कचरा संकलन करणे व वाहतूकीसाठी कामगार पुरविणे २० दिवसांसाठीचे कामगार संख्या २१३ प्रती दिवस याप्रमाणे एकूण खर्च रक्कम रु.१३,७२,२८०/- मात्र खर्चाची संविदा.

७. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./०५ दि.३०/०४/२०२० अन्वये जळगांव शहर महानगरपालिका १७ मजली प्रशासकीय इमारतीत व इतर तीन ठिकाणी सुरक्षा रक्षक पुरविणे कामाच्या मंजुर दरात राजेश्री छत्रपती शाहु महाराज हॉस्पीटल येथे कॉरंटाईन वार्ड तयार करण्यात आलेले असुन त्याठिकाणी सुरक्षा रक्षक पुरविणे कामी मक्तेदार शिवा सिक्युरिटी सर्व्हीसेस,जळगांव यांचे ०८ महिन्याकरिता तिन पाळीत ०६ सुरक्षा रक्षक पुरविणे कामी एकूण खर्च रक्कम रु.६,३६,८६४/- मात्र खर्चाची संविदा.

८. प्रशासकीय आदेश क्र.०१ दि.३०/०४/२०२० अन्वये १४ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या निधीमधून महानगरपालिकेच्या विविध वार्ड मध्ये घनकचरा व्यवस्थापना अतंर्गत कामगार व वाहने पुरवणे कामी येणारा एकूण खर्च रक्कम रु.४०,३०,०००/- मात्र खर्चाची संविदा.

९. प्रशासकीय आदेश क्र.०२ दि.३०/०४/२०२० अन्वये दैनंदिन रस्ते व गटार साफ सफाई करिता ३१ दिवसांसाठी प्रती दिवस ४०० कामगार प्रती कामगार खर्च रु.५२०/- याप्रमाणे कामगार पुरविणे कामी मक्तेदार एस.के.कॉन्ट्रक्टर,जळगांव यांचे एकूण खर्च रक्कम रु.६४,४८,०००/- मात्र खर्चाची संविदा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४** **प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- सनकत चेतन गणेश**
**अनुमोदक :- देशमुख प्रतिभा गजानन**

**मा.सभापती:-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.
राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**